# सिद्धटेकचा श्री सिद्धीविनायक

**ज्यामुळे प्राप्त होई सिद्धी... असा हा सिद्धीविनायक सर्व सिद्धींचा अधिपती...**



## श्री क्षेत्र सिद्धटेक :

सिद्धटेक हे भीमा नदीवर वसलेले सिद्धिविनायकाचे स्वयंभू स्थान आहे. अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात हे ठिकाण असून दौंडपासून ९९ कि.मी. अंतरावर आहे. तर राशिनपासून १४२ कि.मी. अंतरावर आहे.

## सिद्धीविनायकाचे देवालय :

सिद्धटेकचा श्री सिद्धिविनायक हा अष्टविनायकांपैकी तिसरा गणपती. मंदीर टेकडीवर असून पेशवेकालीन महत्त्व लाभले आहे. तिथे पेशव्यांचे सरदार हरिपंडीत फडके यांचा वाडा आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी जिर्णोद्धार करुन सिद्धीविनायकाचे मंदिर बांधले आहे. मंदिर उत्तराभिमुख आहे. देवळाचा आतील गाभारा सुमारे १७ फूट उंचीचा असून त्याची रुंदी १० फूट आहे. या गाभाऱ्यात देवाचे शेजघर आहे. तेथेच बाजूस शिवपंचायतन आहे. बाहेरच्या बाजूस मोठा प्रशस्त मंडप आहे. पुढे महाद्वार व त्यावर नगारखाना आहे तिथे त्रिकाळ चौघडा वाजतो. बाहेर मारुतीचे मंदीर आहे. श्रींच्या मंदीराच्या पश्चिमेस श्री शिवाई देवीचे व श्रीशंकराचे लहानसे मंदीर आहे. जवळच भीमा नदी असल्याने या नदीच्या परिसरात सुंदर घाट बांधण्यात आले आहेत. भीमा नदीला कितीही मोठा पूर आला तरी येथे तिचा आवाज होत नाही. तेथे राखणदार म्हणून श्रीकाळभैरवाचे देवस्थान आहे.

## सिद्धीविनायकाची मूर्ती :

अष्टविनायकांपैकी एकमेव उजव्या सोंडेचा गणपती. येथील विनायकाच्या मूर्तीची सोंड उजवीकडे झुकलेली असल्यामुळे हे दैवत कडक मानतात. सिद्धीविनायकाची स्वयंभू उत्तराभिमुख मूर्ती गजमुखी असून तीन फूट उंच व अडीच फूट रुंद आहे. मखर पितळेचे असून उजव्या-डाव्या बाजूंना जय-विजयांच्या मोठ्या मूर्ती तर मखराभोवती चंद्र-सूर्य-गरुड यांच्या प्रतिमा आहेत. सिंहासन पाषाणाचे आहे. गणेशाने एक मांडी घातलेली असून त्यावर ऋद्धी-सिद्धी बसलेल्या आहेत. मागील प्रभावळीवर चंद्र, सूर्य आणि गरुडाच्या आकृती असून मध्यभागी नागराज आहे.

## नैमित्तीक उत्सव :

भाद्रपद शुक्ल १ ते ५ व व माघ शु. १ ते ५ असे वर्षातून दोन उत्सव असतात. त्यावेळेस श्रींची महापूजा, नैवेद्य इ. होतो. तीन दिवस रात्री ८ वाजता पालखी, मिरवणूक, १० ते १२ पर्यंत धूपारती-शेजारती होऊन नंतर देवनिद्रा. पहाटे ५ वाजता पुन्हा पालखी-मिरवणूक काढतात. ती रात्री ८ वाजता मंदीरात जाते.

## इतिहास :

भीमा नदीकिनारी या तिर्थक्षेत्री महर्षी वेदव्यासांनी यज्ञ केला. आजही यज्ञस्थानी भस्म निघते. श्री विष्णूला इथे सिद्धी प्राप्त झाली होती. चिंचवडच्या मोरया गोसावींना आणि केडगावच्या नारायण महाराजांना इथंच सिद्धी प्राप्त झाली. मोरया गोसावी यांनी येथेच प्रथम उग्र तपश्चर्या केली होती व येथे आदेश मिळाल्यावरुन ते नंतर मोरगावी गेले असे सांगतात. केडगावच्या नारायण महाराजांनी येथेच श्रीसिद्धिविनायकाची सेवा केली. पेशव्यांचे सरदार हरिपंत फडके यांनी आपले सेनापतीपद गमावल्यानंतर येथेच २१ दिवस देवाची उपासना केली आणि गमावलेले पद त्यांना फिरुन मिळाले. त्यांचा देवाजवळच मोठा वाडा आहे. खडर्याच्या लढाईनंतर त्यांचे देहावसान येथेच झाले. हे ऐतिहासिक महत्त्वही या क्षेत्राला आहे.

## पौराणिक कथा :

या स्थानाला सिद्धटेक असे का म्हणतात व येथील गणेशाला श्रीसिद्धीविनायक असे नाव का पडले यासंबंधी एक पौराणिक कथा आहे ती अशी...

फार प्राचीन काळी, एकदा ब्रह्मदेवाला वाटले, आपण सृष्टीरचना करावी. यासाठी त्याने गणेशाच्या आज्ञेनुसार तपश्चर्या सुरु केली. गणेशाने त्याला एकाक्षरमंत्राचा जप दिला होता. ब्रह्मदेवाच्या उग्र तपश्चर्येने गणेश प्रसन्न झाला व 'तुझ्या सर्व मनःकामना पूर्ण होतील' असा ब्रह्मदेवाला त्याने वर दिला. मग ब्रह्मदेवाने सारी सृष्टी निर्माण केली. त्यावेळी क्षीरसागरात गाढ झोपलेल्या भगवान विष्णूंच्या कानातून मधु व कैटभ हे दोन राक्षस निर्माण झाले. त्यांनी ब्रह्मदेवास त्रास देण्यास सुरुवात केली. सारी पृथ्वी भयभीत झाली. तेव्हा सर्व देवांनी भगवान विष्णूला जागे केले. विष्णूचे व मधु-कैटभांचे घनघोर युद्ध झाले. पाच हजार वर्षे युद्ध चालले, तरी विष्णू त्या दैत्यांना मारु शकला नाही; म्हणून तो शंकराकडे गेला. युद्धारंभी तू गणेशाचे स्तवन केले नाहीस, म्हणून तुला विजय मिळतनाही, असे शंकर म्हणाले. तेव्हा विष्णू एका पवित्र टेकडीवर आला. तेथे त्याने 'श्रीगणेशाय नमः' या षडाक्षर मंत्राने गणेशाची आराधना केली. त्या तपश्चर्येने विनायक (गणेश) प्रसन्न झाला. विनायकाच्या कृपेने विष्णूला सिद्धी प्राप्त झाली. मग त्याने मधु-कैटभांना ठार केले. विष्णूला श्रीविनायक ज्या ठिकाणी प्रसन्न झाला व ज्या ठिकाणी सिद्धी प्राप्त झाली, त्या ठिकाणी विष्णूने एक मोठे मंदिर बांधले व त्यात गंडकीशिलेची विनायकाची मूर्ती स्थापन केली. या ठिकाणी विष्णूची कार्यसिद्धी झाली, म्हणून या स्थानाला सिद्धटेक असे म्हणतात व येथील विनायकाला 'श्रीसिद्धविनायक' असे म्हणतात. या वेळेपासून सिद्धटेक हे स्थान गणेशाचे पवित्र तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते.

कालांतराने ते मंदिर नष्ट झाले. पुढे एका गुराख्याला या टेकडीवर विनायकाने दृष्टांत दिला. तो गुराखी रोज भीमा नदीच्या पाण्याने गणेशाला स्नान घालीत असे व आपल्या शिदोरीचा नैवेद्य दाखवीत असे. तेव्हा गणेशाने त्याला सांगितले. तू स्वतः माझी पूजा न करता एखाद्या ब्राम्हणाकरवी कर. तेव्हा त्याने पुरोहित नावाच्या ब्राम्हणाकडून श्रींची पूजा सुरु केली. पुढे पेशवे काळात येथे मंदिर बांधण्यात आले, अशी एक आख्यायिका आहे.



**सिद्धटेकी विनायक। सिद्धदाता विघ्ननाशक।**
**विष्णूही ज्याचा पूजक । त्यासी वंदन आदरे ।।**